इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:**- शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८३ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२०१९३२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )

उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबतच्या शासन निर्णय क्रमांक नप्राशा -१००८/ प्र. क्र. ६७९ / प्राशि-३ , दिनांक ऑगस्ट २००९ चे सहपत्र

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| ३८ | आर.ए. शिक्षण मंडळ, स्नेहांकूर चंदननगर, पुणे | नारायणराव तापकीर इंग्लीश मिडीअम स्कूल, चोवीस वाडी, हवेली, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३९ | ना.हर्षवर्धन पाटील बहुउद्देशीय शिक्षण संस्था, शेटफळगढे, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री.नागेश्वर इंग्लिश मिडिअम स्कूल, शेटफळ गडे, ता.इंदापूर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ४० | श्री.भागचंदानी प्रतिष्ठान, कळंब, वालचंदनगर, ता.इंदापूर, जि.पुणे | संतर कंवरराम इंग्लिश मेडिअम स्कूल, कळंब, वालचंदनगर, इंदापूर | इंग्रजी | १ ली |
| ४१ | शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान, बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे | एस.बी.पाटील इंग्लिश मिडीअम स्कूल वनगळी, बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ४२ | कै.चांदू दादू भोसले स्मृती आरोग्य प्रतिष्ठान, जंक्शन,लासूर्णे, इंदापूर | न्यूटन प्रायमरी इंग्लिश मिडीअम स्कुल, जंक्शन,लासूर्णे, इंदापूर | इंग्रजी | १ ली |
| ४३ | श्री.श्री.रविशकर विद्यामंदिर ट्रस्ट महाराष्ट्र व्दारा शरद ठक्कर दामोदर भवन ७/अ ढोले पाटील रोड पुणे १ | श्री.श्री.रविशकर विद्यामंदिर ५६२ तथास्तु शामसुंदर सोसा. लेन म्हात्रे ब्रिजजवळ, पुणे ३० | इंग्रजी | १ ली |
| ४४ | न्यु. महाराष्ट्र एज्यु. टस्ट्र ३८४ भवानी पेठ, पुणे २ | ऑर्किड प्रायमरी स्कूल ३८४ भवानी पेठ, पुणे २ | इंग्रजी | १ ली |
| ४५ | रोझरी एज्यु. सोसा. १४ आंबेडकर रोड, पुणे १ | रोझरी प्रायमरी स्कूल बिबवेवाडी, विजय टाईल्सच्या मागे स्पन्सररोड समोर ब्लॉक नं. ६९१ पुणे ३७ | इंग्रजी | १ ली |
| ४६ | किसान प्रतिष्ठान पाडोळी ना ता. कळंब जि. उस्मानाबाद | एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल, काळेपडळ स.नं. ३०५ साईविहार हडपसर पुणे२८ | इंग्रजी | १ ली |
| ४७ | दि के . चंदुभाई दारुवाला एज्यु.सोसा. ३अे/१४७, सॅलसबरी पार्क पुणे३७ | ग्रीनवुड स्कूल प्लॉट नं. ६१, हडपसर पुणे २८ | इंग्रजी | १ ली |
| ४८ | युवा असो. फॉर सोशल हार्मोनि ८८/२+३ बी आझदनगर कोथरुड पुणे ३८ | डॉ. विश्वनाथ क-हाड प्राय. ॲण्ड सेकंडरी स्कूल स.नं. ११५ /१/२९+३० वारजे पुणे ५२ | इंग्रजी | १ ली |
| ४९ | महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था स.नं. ३११/२ ससाणे नगर हडपसर पुणे २८ | ज्ञानप्रबोधिनी इंग्लिश मिडीयम स्कूल स.नं. ३११/२ ससाणे नगर हडपसर पुणे २८ | इंग्रजी | १ ली |
| ५० | सोनाई शिक्षण संस्था कोढवे धावडे ता. हवेली पुणे | अजिंक्य देडगे पब्लीक स्कूल स.नं. २७ , धायरी नांदेड फाटङ्गि ता. हवेली पुणे | इंग्रजी | १ ली |
| ५१ | नोबल एज्यु. वेलफेअर ॲण्ड युथ असो. स.नं. ५५ भाग्योदय नगर ५ स्टार बेकरीसमोर कोंढवा खुर्द पुणे ४८ | प्राथमिक शाळा, स.नं. ३५८ अप्पर कोंढवा रोड बिबवेवाडी पुणे ३७ | इंग्रजी | १ ली |
| ५२ | फोरम फॉर कल्चर स्टडिज १० उषा मनोर गणेशखिंडरोड, पुणे ७ | ग्लोकुल स्कूल १० उषा मनोर गणेशखिंडरोड, पुणे ७ | इंग्रजी | १ ली |
| ५३ | रोझरी एज्यु.सोसा. १४, डॉ.आंबेडकर रोड, पुणे १ | रोझरी प्रायमरी स्कूल वझीर कॅसकेड, स.नं. ४६/ १४/५/२ बिल्डींग नं. डी, कोढंवा खुर्द, पुण ४८ | इंग्रजी | १ ली |
| ५४ | महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था स.नं. ३११/२ ससाणे नगर हडपसर पुणे २८ | यशोदिप इंग्लिश मिडीयम स्कूल स.नं. १३५ वारजे माळवाडी पुणे ५८ | इंग्रजी | १ ली |
| ५५ | श्री साई एज्यु. एज्यु. सोसा. ३०५१, क्लोव्हर हाईटस साळुंके विहार रोड, वानवडी पुणे ४० | वात्सल्य स्कूल ३०५१, क्लोव्हर हाईटस साळुंके विहार रोड, वानवडी पुणे ४० | इंग्रजी | १ ली |

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१८/प्र.क्र.१०/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: २६ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३. दिनांक २/७/२०१३
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/७३४०/प्रशा-ड/५१२-अ-१/२०७०, दिनांक २८/०४/२०१७
३. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/८८४४/प्रशा-ड/५१२/-अ-१/दि. ११/७/२०१७
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र, राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/८२७८/प्रशा-ड/५१२-अ-१/३२४७ दि. १५/७/२०१७
५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/१०२१४/प्रशा-ड/५१२-अ-१/३८५२, दिनांक ३०/०८/२०१७
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/६५८९/प्रशा-ड/५१२-अ-१/३९६५, दिनांक ७/०९/२०१७

शासन निर्णय:-

खाजगी प्राथमिक शाळांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अक्र. | शाळेचे नांव | माध्यम | मागणी केलेला वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | दि.जिनियस इंग्लिश मिडीयम हायस्कुल, हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | श्री. नागेश्वर न्यू इंग्लिश स्कुल, मोशी ता. हवेली जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | ग्रिनवूड स्कुल हडपसर, पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ४ | शांती निकेतन इंग्लिश (कॉन्व्हेंट) प्रायमरी शाळा, मुर्तिजापूर, जि. अकोला | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ५ | हिमांशु किडस इंग्लिश स्कुल, जि.प.नगर म्हाडा रोड, खडकी बु. जि. अकोला | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ६ | एमरॉल्ड हाईटस स्कुल, गोरक्षरोड, अकोला | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ७ | एमरॉल्ड हाईटस जठारपेठ जि. अकोला | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ८ | संत गजानन विद्यालय, पारस, अकोला | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |

Principal
Greenwoods School
Hadapsar, Pune.

२. वरील शाळांना सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( अ.वा. बोरवणकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे, अमरावती,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे, अकोला,
७. निवडनस्ती एसएम-५.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी **२०१७-१८** या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.९२४/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ५ सप्टेंबर, २०१८

**प्रस्तावना -**

१. दि.के.चंदुभाई दारूवाला एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित ग्रीनवुड्स स्कुल, इंद्रप्रस्थ सोसायटी, आकाशवाणी जवळ, हडपसर, पुणे-४११ ०२८ या शाळेचा दर्जावाढ प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस दर्जावाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत दि.के.चंदुभाई दारूवाला एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित ग्रीनवुड्स स्कुल, इंद्रप्रस्थ सोसायटी, आकाशवाणी जवळ, हडपसर, पुणे या शाळेस (उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक, इ. ९ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ **अटी व शर्ती -**

(१) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार** अधिनियम, २००९मधील **तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व** नियमांची /तरतुदींची पुर्तता **करणे आवश्यक आहे.**

(२) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९**मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्याआत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

**ब)** व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०13 चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(६) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, ***"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"*** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"**असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

५/६/२०१८

(रा.वि.कुडले)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
5. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.
6. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प.पुणे .
७. निवडनस्ती (एसएम-२)